**महापालिका आयुक्त कार्यालय**
पुणे महानगरपालिका
जा.क्र. :- मआ/साप्रवि/आस्था/ ७७६८
दिनांक :- १२/०१/२०२१

**-: आदेश :-**

**विषयः-** पुणे महानगरपालिकेच्या मालकीच्या वसाहतींचा पुर्नविकास करणेसाठी समन्वय अधिकारी म्हणून नियुक्ती करणेबाबत.

पुणे महानगरपालिकेच्या मालकीच्या जागांवर पुणे मनपाच्या सेवकांकरीता चाळी बांधलेल्या आहेत. त्या चाळी बऱ्याच जुन्या झाल्या असून जिर्ण अवस्थेत व मोडकळीस आलेल्या आहेत. तरी त्या चाळींचा पुर्नविकास करणेसाठी योग्य ते धोरण ठरवून तात्काळ कार्यवाही करणे हे अत्यंत आवश्यक असल्याचे निदर्शनास आले आहे.

तरी या कामी श्री. राजेंद्र मुठे, उप आयुक्त, मालमत्ता व्यवस्थापन विभाग यांची समन्वय अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात येत आहे.

श्री. राजेंद्र मुठे, उप आयुक्त, मालमत्ता व्यवस्थापन विभाग यांनी अधिक्षक अभियंता (बांधकाम विभाग), अधिक्षक अभियंता (भवन रचना विभाग) व उप आयुक्त (झोपडपट्टी निर्मुलन व पुनर्वसन विभाग - चाळ विभाग) यांचेसह पुणे मनपातील विविध विभागांशी समन्वय साधून उपरोक्त कामकाज करावयाचे आहे.

श्री. राजेंद्र मुठे, उप आयुक्त, मालमत्ता व्यवस्थापन विभाग यांनी उपरोक्तप्रमाणे अतिरिक्त कामकाज स्विकृत केलेबाबतचे निवेदन आमचे विभागाकडे सादर करावयाचे आहे.

तरी, संबंधीत खातेप्रमुख यांनी जरूर ती पुढील तजवीज करावी.

(विक्रम कुमार)
**महापालिका आयुक्त**
पुणे महानगरपालिका

प्रत :- १) अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज/ई/वि),
पुणे महानगरपालिका यांजकडेस माहितीस्तव . . .
२) खातेप्रमुख (सर्व), पुणे महानगरपालिका
यांजकडेस माहिती व पुढील तजवीजीसाठी . . .